महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:- १४४२/गट-क संयुक्त/२०१९/तेरा-ब दिनांक ०५ ऑगस्ट, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:**- सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवामधील नियुक्त्यांचे अणि पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ अनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रर्वगाकरिता आरक्षण विहित करण्यात आले होते.

**२.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रर्वगाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे,२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक ३१ मे, २०२१ तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :बीसीसी-२०२१/प्र.क्र.३६०/१६-ब, दिनांक १५ जुलै, २०२१ अन्वये मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक सूचनातील तरतुदीनुसार संबंधित जाहिरातीस अनुसरून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा (SEBC) दावा केलेल्या उमेदवारांना पात्रतेनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी अनुज्ञेय (EWS)आरक्षणाचा लाभ घेता येईल. त्यानुसार आयोगामार्फत दिनांक ९ सप्टेंबर, २०२० पूर्वी नियुक्तीकरिता शिफारस करण्यात आलेल्या परंतु दिनांक ९ सप्टेंबर, २०२० नंतर नियुक्ती देण्यात न आलेल्या खालील पदभरती प्रकरणी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता (SEBC) आरक्षित असलेली पदे, जाहिरातीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षण नसल्यास, अराखीव पदांत रूपांतरित करून तसेच जाहिरातीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा उल्लेख असेल अशा प्रकरणी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (SEBC) उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी आरक्षित पदांचा (EWS) लाभ मिळण्यासाठी संबंधित उमेदवारांना अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे, याकरिता विकल्प देणे आवश्यक आहे :-

| **परीक्षेचे नाव- महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०१९** | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव |
| १ | १४/२०१९ | लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) |
| २ | १५/२०१९ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क |
| ३ | १६/२०१९ | कर सहायक |

**३.** उपरोक्त पदभरती/परीक्षांकरिता अर्जाद्वारे फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा (SEBC) दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ३१ मे, २०२१, दिनांक ६ जुलै, २०२१ व दिनांक १५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विकल्प देण्यासंदर्भातील कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे. :-

(१) संबंधित पदभरती/परीक्षांकरिता अर्जाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचा (SEBC) दावा केलेल्या उमेदवाराने अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी कोणता लाभ घ्यावयाचा आहे, याबाबतचा विकल्प देणे आवश्यक आहे.

(२) निवड प्रक्रियांमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या (SEBC) उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहिरातीमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आरक्षण लागू आहे, त्यांना आरक्षण अनुज्ञेय करताना सन २०१९-२०२० मधील परीक्षांसाठी मार्च २०२० पर्यंतचे EWS प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(३) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या (EWS) आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी दिनांक ३१ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे व प्रमाणपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(४) ज्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या (SEBC) महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरातीमध्ये (दोन किंवा अधिक टप्प्यांची परीक्षा असल्यास पूर्व परीक्षेची) नमूद केल्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या (SEBC) आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र अराखीव महिला पदासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

(५)...

(५) अराखीव (खुला) तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या (EWS) लाभाकरिता विकल्प सादर करणा-या उमेदवारांनी संबंधित जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.

(६) अर्ज केलेल्या प्रत्येक परीक्षा/संवर्गाकरिता वरीलप्रमाणे विकल्प निवडणे अनिवार्य आहे.

(७) अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी (EWS) असलेल्या आरक्षणाचा दावा विहित कालावधीत सादर न करणा-या उमेदवारांचा फक्त अराखीव (खुला) पदावरील निवडीकरिता विचार करण्यात येईल.

(८) विहित कालावधीत विकल्प सादर केलेल्या अथवा विकल्प सादर न केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत एकदा सादर केलेल्या / सादर न केलेल्या दाव्यातील बदलाबाबतची मागाहून केलेली विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य केली जाणार नाही.

(९) उपरोक्त कार्यपध्दत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गाच्या (SEBC) आरक्षणाच्या अनुषंगाने विविध न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासनाकडून घेण्यात येणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहील.

**४.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील (SEBC) उमेदवारांनी उपरोक्त पदभरती/परीक्षांपैकी ज्या पदभरती / परीक्षांकरिता अर्ज केला आहे, त्या प्रत्येक पदभरती/परीक्षांकरिता अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) यापैकी जो विकल्प निवडावयाचा आहे, त्याकरिता आयोगाच्या **https://mpsc.gov.in** या संकेतस्थळावरील 'Online Facilities' या सदराखालील (सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग) 'SEBC Option Change' वर क्लिक करून पुढीलप्रमाणे प्रक्रिया करावी.:-

(१) उपरोक्त पदभरती/परीक्षांपैकी अर्ज केलेल्या पदभरती/परीक्षेची जाहिरात निवडावी.

(२) अर्जामध्ये नमूद केलेला मोबाईल क्रमांक नोंदवून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा OTP प्रविष्ट करून लॉगिन करावे.

(३) अराखीव (खुला) / आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ( EWS ) यापैकी सुयोग्य पर्याय निवडावा.

(४) 'Submit' बटणावर क्लिक करून निवडलेला तपशील सादर करावा.

(५) सादर केलेला तपशील जाणून घेण्यासाठी अथवा संग्रही ठेवण्यासाठी स्वेच्छेनुसार तपशीलाची छपाई करता येईल.

**५.** प्रस्तुत कार्यपध्दतीच्या अनुषंगाने विकल्प सादर करताना अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-२६७३-८८९ अथवा १८००-१२३४-२७५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून आवश्यक मदत प्राप्त करून घेता येईल.

**६.** उपरोक्त वेबलिंक **दिनांक ०५ ऑगस्ट, २०२१ ते दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** कार्यान्वित राहील.

उपसचिव (परीक्षा-२)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग